**फौजदारी जामीन अर्ज क्र. ५५/२०२६**
**विमलबाई ब्रम्हानंद मस्के**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
**(CNR NO. MHBU20-000117-2026)**

## नि.क्र. १ खाली आदेश
**(पारीत दिनांक ११ मार्च २०२६)**

०१] प्रस्तुतचा अर्ज; अर्जदार – **विमलबाई ब्रम्हानंद मस्के** हिने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८२ अन्वये अटकपूर्व जामीन मिळण्याकामी दाखल केला आहे.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीची मुलगी (मयत रोहीणी प्रविण म्हस्के) हिला सन २०२५ पासून ते दिनांक ०२.०३.२०२६ पावेतो वेळोवेळी चारचाकी वाहन घेण्यासाठी माहेरुन पैसे आणण्याची मागणी करुन शारीरीक व मानसीक त्रास देवुन तिचा छळ केला. आरोपींनी रोहीणी हिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे रोहीणी प्रविण म्हस्के हीने घरातील टिनपत्राखालील लोखंडी ॲंगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या केली. अशा आशयाची फिर्याद पोलीस ठाणे, बिबी येथे दाखल करण्यात आली.

०३] अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. एस. ए. वाकळे यांनी युक्तिवाद केला की, घटना ही दिनांक ०२.०३.२०२६ रोजी घडली असून फिर्याद १ दिवस उशिरा दिनांक ०३.०३.२०२६ रोजी दाखल करण्यात आली. सर्व आरोपींविरूद्ध मोघम व सामान्य स्वरूपाचे आरोप करण्यात आलेले आहेत. बेकायदेशीर मागणीची रक्कम फिर्यादी मध्ये नमूद नाही. त्यामुळे फिर्याद ही बनावट असल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध होते. अर्जदाराकडून काहीही जप्त करणे नाही. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. अर्जदाराला अटकपूर्व जामीन मिळाल्यास ती जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला अटकपूर्व जामीन देण्याची विनंती करण्यात आली.

०४] याउलट, विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. यु. एस. आपटे यांनी तपासी

अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, अर्जदार ही मयताची सासू आहे. मयताला त्रास देण्यात आल्यामुळे तिने आत्महत्या केली. या गुन्ह्यातील तपास प्राथमिक अवस्थेत आहे. अर्जदाराला अटकपूर्व जमानत दिल्यास ती तपासात अडथळा निर्माण करू शकते. तसेच अर्जदार साक्षीदारांना फितूर करू शकते. म्हणून अर्जदाराचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

**०५]** दोन्ही पक्षाचा युक्तीवादाचे अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, घटना ही दिनांक ०१.०३.२०२६ ते ०२.०३.२०२६ चे दरम्यान घडली असून फिर्याद दाखल करण्यास एक दिवसाचा विलंब झालेला आहे. फिर्याद पाहता सर्व आरोपींविरूद्ध एकाच प्रकारचे आरोप लावण्यात आलेले आहेत. फिर्यादीत किती रकमेची बेकायदेशीर मागणी करण्यात आली याचा उल्लेख आलेला नाही. म्हणून फिर्याद ही मोघम स्वरूपाची असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. परिणामी, या सर्व बाबी बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

**०६]** अर्जदार ही महिला आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही. अर्जदाराच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण तपास संपलेला आहे. अर्जदाराविरुध्दचे आरोप पाहता तिच्याकडून काहीही जप्त करणे नाही. परिणामी तपासाकरीता तिच्या कोठडीची आवश्यकता भासणार नाही. अर्जदार ही तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. अर्जदाराला अटकपूर्व जामीन मिळाल्यास ती जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यांस तयार आहे. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भिती आणि साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादुन केले जावू शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य व परिस्थीती, गुन्ह्यासाठी असलेली शिक्षेची तरतुद, अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता, अर्जदाराचा अटकपूर्व जमीन अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता पुढील आदेश पारीत करण्यांत येतो.

## – आ दे श –

**०१]** अटकपूर्व जामीन अर्ज क्र. ५५/२०२६ मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार – **विमलबाई ब्रम्हानंद मस्के** हिला अटक होते वेळेस पोलीस ठाणे, बिबी

येथील अपराध क्र. ५७/२०२६, कलम १०८, ८५, ८६ सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता खालील गुन्ह्यात तिचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर अटकपूर्व जामीनावर सोडण्यात यावे.ऽ

०३] अर्जदार हिने तपासात सहकार्य करावे आणि दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत दर सोमवारी तपासी अंमलदारपुढे दुपारी ०२.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान हजर राहावे.

०४] अर्जदार हिने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

०५] अर्जदार हिने दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत मौजे बोराखेडी बु., ता. सिंदखेड राजा या गावात प्रवेश करू नये.

०६] अर्जदार हिने यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

०७] अर्जदार हिने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास तिची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR　Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR Date: 2026.03.13 15:27:50 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरीक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – ११.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – ११.०३.२०२६